पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक: नस/ ९/कावि/११/२०१६
दिनांक : ०८ /०१/२०१६

प्रति,


मा. ...................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०१/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी - २०१६ ची मासिक मा.महापालिका सभा बुधवार दिनांक २०/०१/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

**सूचना**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

**कार्यपत्रिका क्रमांक ५३**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी - २०१६ ची मासिक मा.महापालिका सभा बुधवार दिनांक २०/०१/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक - ५० दिनांक (दि.२०/१०/२०१५ (दु. २.०० व २.२५), दि.१६/११/२०१५ व दि.२०/११/२०१५ (दु.१.०० व १.२०) चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक - ५१ दि.२०/११/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**प्रश्नोत्तरे**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये)

----------

**मा.शहर सुधारणा समितीचे ठराव**

**विषय क्रमांक १)** संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/दापोडी/टे-१२/९२/२०१५, दि.०८/१२/२०१५
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.३५ दि.१५/१२/२०१५

मौजे दापोडी भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील अधिसुचना क्रं.पीसीसी- ३०९६/१८०१/सी.आर-२६१/नवि-२२. दि.११/०९/१९९७ अन्वये शासनाकडुन मंजुर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार दापोडी हे गाव पुणे मनपा मधुन पिं.चि.मनपा मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.मौजे दापोडी येथील स.नं.८५अ पैकी आरक्षण क्र.३/२८ किरकोळ बाजार प्रस्तावित केलेले आहे, सदरचे आरक्षण डि.पी.रिपोर्टनुसार सुमारे १०००.०० चौ.मी.क्षेत्रावर आहे. सदर आरक्षणाचे भूसंपादन प्रस्ताव महानगरपालिकेने पाठविला नाही. सद्यस्थितीमध्ये पुणे-मुंबई

महामार्गापासुन सांगवी गावाकडे जाणा-या व रेल्वेलाईन फाटकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस भाजी मंडई आहे.सदरचा रस्ता खुपच वर्दळीचा असलेने सदर ठिकाणी रेल्वेलाईनच्या फाटकामुळे ब-याच वेळा अपघात होतात व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. तसेच मा.नगरसदस्यांची वारंवार मागणी आहे की मौजे दापोडी येथे भाजी मंडई ( किरकोळ बाजार ) चे आरक्षण विकसित करावे म्हणजे दापोडीमधील नागरिकांना भाजी खरेदीसाठी रेल्वेलाईन वरील फाटक ओलांडुन जाण्याची आवश्यकता भासणार नाही.त्यामुळे आ.क्र.३/२८( किरकोळ बाजार ) चे आरक्षणाची जागा लवकर ताब्यात घेऊन भाजी मंडई (किरकोळ बाजार ) विकसित करावे. तरी सदरचे आरक्षणाचे जागेचा भुसंपादनाचा प्रस्ताव तयार केलेला असुन सदर भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठवावा लागणार आहे. सदर भुसंपादन पाठविणे कामी मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. केंद्र शासनाने “The Right to fair compensation and Transparency in land acquisition ,Rehabilitation Resettlement Act 2013” हा नविन भूसंपादन कायदा तयार केला असून दि.०१/०१/२०१४ पासुन सदरचा कायदा अंमलात आला आहे.तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

## समित्यांचे अहवाल

## विधी समिती

**विषय क्रमांक २)** अ) दि.४/१२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.१८/१२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

--------

## मा.शहर सुधारणा समिती

**विषय क्रमांक ३)** अ) दि.१७/११/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.१/१२/२०१५ व १५/१२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.
क) दि.१५/१२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

**विषय क्रमांक ४)** दि. २/१२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/९/कावि/११/२०१६
दिनांक : ०८/०१/२०१६

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस)
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.